स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

---

संदर्भ : रासेयो/२०२३–२४/२१७ दि. १८/०७/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे शहर,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय : पुणे महानगरपालिकेमार्फत आयोजित स्वच्छ सर्वेक्षण २०२३ च्या अनुषंगाने सिटीझन्स फीडबॅकबाबत**

महोदय,

मा. उप आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या पत्रानुसार महाराष्ट्र शासनाकडून स्वच्छ सर्वेक्षण २०२३ (SS2023) ची सुरवात झाली असल्याचे कळविण्यात आले आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०२३ ची थीम "वेस्ट टू वेल्थ" अशी आहे. शहरातील स्वच्छता विषयक कामकाजाची सातत्यता तपासण्याकरिता शासनाने काही निकष निश्चित केले आहे व त्यांना गुणांकन देण्यात आले आहे. यामध्ये शहरातील तरूण वयोगट (वय वर्षे १५ ते २९) व सिनीअर सिटीझन्स (वय वर्षे ६० व त्यापुढील) यांच्याद्वारे प्राप्त होणाऱ्या ऑनलाईन अभिप्राय(फीडबॅकला) गुणांकन असणार आहे.

त्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना SS2023 CITIZEN'S FEEDBACK द्वारे शहराविषयी सकारात्मक प्रतिक्रिया नोंदविण्याच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच विद्यार्थ्यांचे कुटुंबीय, मित्र वर्ग यांना याबाबतची माहिती देऊन यांच्याकडूनही जास्तीत जास्त प्रतिक्रिया घ्याव्यात. स्वच्छ सर्वेक्षण २०२३ च्या थेट परीक्षणाच्या वेळी याच नागरिकांपैकी ठराविक नागरिकांस केंद्र सरकारकडून फोन येऊ शकतील याची माहिती संबंधीतांना द्यावी. सदर अभिप्राय दि. २२ जुलै २०२३ पर्यंत नोंदवून दि. २४ जुलै २०२३ पर्यंत swmadmin@punecorporation.org या संकेतस्थळावर पाठविण्यात यावा. कळावे, ही विंनती.

- वेबसाईटद्वारे प्रतिक्रिया देण्याची पध्दत–

**(SWACHH SURVEKSHAN 2023 CITIZEN'S FEEDBACK)**
**https://sbmurban.org/feedback**

↓

नागरिकांचा अभिप्राय

↓

नाव, मोबाईल नं., ईमेल आयडी इ. प्राथमिक माहिती भरा

↓

रजिस्टर मोबाईल नंबरवरती आलेला OTP टाका

↓

प्रश्नांची उत्तरे दया

↓

अभिप्राय सबमिट करा.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

अधिक माहितीकरिता : मा. उप आयुक्त कार्यालय, घनकचरा व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका यांचे पत्र

उप आयुक्त कार्यालय
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- घकव्यका/१९४७
दिनांक :- ११/०७/२०२३

प्रति,
मा.एनएसएस कार्यक्रम समन्वयक
राष्ट्रीय सेवा योजना
पुणे

विषय :- स्वच्छ सर्वेक्षण २०२३ च्या अनुषंगाने सिटीझन्स फीडबॅकबाबत.
संदर्भ :- महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय पत्रक्र.राअस/स्वमअ/४३६/२२-२३, दिनांक ०१/०६/२०२२.

वरील संदर्भांकित पत्रान्वये महाराष्ट्र शासनाकडून स्वच्छ सर्वेक्षण २०२३ (SS2023) ची सुरवात झाली असल्याचे कळविण्यात आले आहे. या सर्वेक्षण २०२३ ची थीम 'वेस्ट टू वेल्थ' अशी असून त्याचे सविस्तर टूलकीट जाहीर करण्यात आलेले आहे.

शहरातील स्वच्छता विषयक कामकाजाची सातत्यता तपासण्याकरीता शासनाने काही निकष निश्चित केले आहेत व यांना गुणांकन देण्यात आले आहे. यामध्ये शहरातील तरुण वयोगट (वय वर्षे १५ ते २९) व सिनीअर सिटीझन्स (वय वर्षे ६० व त्यापुढील) यांचेद्वारे प्राप्त होणा-या ऑनलाईन फीडबॅकला गुणांकन असणार आहे.

त्या अनुषंगाने आपले अधिनस्त सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना SS2023 CITIZEN'S FEEDBACK द्वारे शहराविषयी सकारात्मक प्रतिक्रिया नोंदविण्याच्या सुचना देण्यात याव्यात. तसेच विद्यार्थ्यांचे कुटुंबीय, मित्र वर्ग यांना याबाबत माहिती देऊन जास्तीत जास्त सकारात्मक प्रतिक्रिया प्राप्त करावयाच्या आहेत.

स्वच्छ सर्वेक्षण २०२३ च्या थेट परीक्षणाच्या वेळी याच नागरिकांपैकी ठराविक नागरिकांस मे.केंद्र सरकारकडून फोन कॉल्स येऊ शकतील याची माहिती संबंधीतांस द्यावी. प्रतिक्रिया देण्याची सविस्तर कार्यपद्धती पुढीलप्रमाणे आहे.

- वेब साईट द्वारे प्रतिक्रिया देण्याची पद्धती:

(SWACHH SURVEKSHAN 2023 CITIZEN'S FEEDBACK)
https://sbmurban.org/feedback
↓
नागरिकांचा अभिप्राय
↓
नाव, मोबाईल नं. ई-मेल आयडी इ. प्राथमिक माहिती भरा.
↓

रजिस्टर मोबाईल नंबर वर आलेला OTP टाका.

↓

प्रश्नांची उत्तरे द्या.

↓

अभिप्राय सबमिट करा.

तरी दिनांक २२/०७/२०२३ रोजीपर्यंत आपले अधिनस्त सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेमार्फत जास्तीत जास्त सकारात्मक अभिप्राय नोंदवून त्याचा अहवाल दिनांक २४/०७/२०२३ रोजीपर्यंत swmadmin@punecorporation.org या संकेतस्थळावर पाठविण्यात यावा.

कळावे.

(आशा राऊत)
उप आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका